# ‘माझा डेटा,माझी जबाबदारी’! अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन, डिजिटल युगात सजग राहण्याचे धडे

[illegible] • महाराष्ट्र, कोकण, मुंबई शहर • August 4, 2025 • 0 Comments



तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे विद्यार्थ्यांचे जीवन अधिकाधिक डिजिटल होत असताना सायबर सुरक्षेचे महत्त्व देखील वाढत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि जबाबदार डिजिटल नागरिक घडवण्याच्या उद्देशाने क्विक हील फाउंडेशन आणि पाटकर-वर्दे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद हायस्कूल, अप्पापाडा, मालाड पूर्व येथे सायबर जनजागृती सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

**अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन**

या सत्रात विद्यार्थ्यांना डिजिटल साधनांचा वापर करताना कोणती खबरदारी घ्यावी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. हे सत्र क्विक हील फाउंडेशनच्या **"Cyber Shiksha for Cyber Suraksha"** या अभियानांतर्गत आयोजित करण्यात आले होते. "माझा डेटा,माझी जबाबदारी" या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमामध्ये पाटकर-वर्दे महाविद्यालयाचे सायबर वॉरियर्स निखिल गुप्ता आणि अपूर्व गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल सुरक्षेचे महत्त्व,वैयक्तिक माहितीचे संरक्षण, सुरक्षित इंटरनेट वापर आणि ऑनलाइन फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाय प्रभावीपणे समजावून सांगितले.



**सत्रादरम्यान विद्यार्थ्यांना 'या' महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले:**

**डेटा संरक्षण आणि गोपनीयता :** वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याच्या टिप्स.

**ऑनलाइन फसवणूक म्हणजे स्कॅम :** डिजिटल स्कॅम्स ओळखणे व त्यापासून बचाव करणे.

**सोशल मीडियाचा सुरक्षित वापर :** सोशल मीडियावर जबाबदारीने कसे वागावे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

**सायबर गुन्ह्यांची नोंद :** सायबर गुन्ह्यांची तक्रार नोंदवण्याची योग्य प्रक्रिया कशी असते हे देखील विद्यार्थ्यांना शिकवण्यात आले.

यावेळी शाळेच्या प्रतिनिधींनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांसाठी सायबर साक्षरता अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद केले. तसेच क्विक हील फाउंडेशन आणि पाटकर-वर्दे महाविद्यालयाच्या या संयुक्त उपक्रमाबद्दल त्यांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली.

